सुधारणा व पुनर्वसन

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन, गृह विभाग
महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा

दुरध्वनी क्रमांक: ०२०-२६१२४८१५
फॅक्स क्रमांक: ०२०-२६१२५८७८
*Email*- igoffice.industry-mh@mah.gov.in
*Website*- *https://mahaprisons.gov.in*

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य,
यांचे कार्यालय, मध्यवर्ती इमारत,
२ रा मजला, पुणे- ४११ ००१.

जा.क्र.कारागृहउद्योग /दरपत्रक-सनदी लेखापाल सेवा/ 1655 /२०२६ /कक्ष-१० दिनांक02/03/२०२६

## दरपत्रक मागणी

कारागृह उद्योग विभागाकरीता शासनाकडून प्राप्त अनुदाने, झालेले उत्पादन तसेच महसूल प्राप्ती यांचे सनदी लेखापालामार्फत (Chartered Accountant) लेखांकन करणे आवश्यक आहे. सदर कार्यवाहीसाठी सनदी लेखापाल (Chartered Accountant) यांची सेवा घेण्यास स्थानिक बाजारातून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| **दरपत्रक सादर करण्याचे ठिकाण :-** | **अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, यांचे कार्यालय, पुणे -४११००१.** |
| **दरपत्रक प्रसिध्दी दिनांक** | **०२ /०३ / २०२६ सकाळी ११.०० वाजेपासून** |
| **दरपत्रक सादर करण्याचा अंतिम दिनांक** | **१२ /०३ / २०२६ सकाळी ११.०० वाजेपर्यत** |
| **दरपत्रक उघडण्याचा दिनांक** | **१२ /०३ / २०२६ सकाळी ११.३० वाजता** |
| **(उक्त दिनांकामध्ये प्रशासकीय सोईनुसार बदल होवू शकतो.)** | |

**अटी व शर्ती -**

१) दर (सर्व करांसहीत) देण्यात यावेत. मुळ दर व जीएसटी हा स्वतंत्र दर्शविण्यात यावा.

२) दरपत्रकामध्ये कोणतीही प्रकारची खाडाखोड करता येणार नाही. दरपत्रकाची वैधता किमान १२० दिवस राहील दरपत्रकास मंजुरी मिळाल्यानंतरच्या आदेशापासून ०७ दिवसांच्या आत सेवा अदा करण्यात यावी.

३) दरपत्रक सिलबंद पाकिटामध्ये **अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे-१** यांचे नावे देण्यात यावे. पाकिटावरती **कारागृह उद्योग - सनदी लेखापाल** (Chartered Accountant) **सेवा** व **आपल्या संस्थेचे/कार्यालयाचे नाव, पत्ता व दुरध्वनी/ मोबाईल क्रमांक स्पष्ट नमुद करण्यात यावा**. सिलबंद नसलेल्या दरपत्रांचा विचार करण्यात येणार नाही.

४) कोणत्याही कारणाशिवाय एखादे दरपत्रक किंवा पुर्ण दरपत्रक प्रक्रिया रद्द करण्याबाबतचे सर्व अधिकार या कार्यालयाने राखुन ठेवले आहेत.

५) दरपत्रक सिलबंद पाकिटात **अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे-१** यांचे कार्यालयास असलेल्या दरपत्रक पेटीतच जमा करावे.

६) सेवा प्रदात्यास येरवडा, कोल्हापुर, नाशिकरोड, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपुर, ठाणे मध्यवर्ती कारागृह व येरवडा खुले कारागृह या ठिकाणी कारागृह उद्योगाबाबत लेखांकन लेखापरिक्षण करणेकामी सेवा द्यावी लागेल.

७) सेवा देणेसाठीचे कार्यालयाची संख्या कमी अथवा अधिक होवु शकते. तसेच, कार्यालयनिहाय व वित्तीय वर्षनिहाय आदेश निर्गमित करण्याचे सर्व अधिकार या कार्यालयास राहतील.

८) लेखांकन अचूक करणे बंधनकारक राहील. लेखांकनामध्ये सनदी लेखापालांकडून झालेल्या चुका आढळल्यास त्या संबंधित त्रुटी स्वखर्चाने दुरुस्त करून सुधारित व अचूक माहिती तात्काळ सादर करावी लागेल.

९) दरपत्रक सादर करतांना खालील प्रमाणे **एका लिफाफ्यामध्ये** सादर करणे आवश्यक आहे.

**या लिफाफ्यामध्ये खालील प्रमाणे नमुद कागदपत्राची पुर्तता करणे बंधनकारक राहील.**

१) CA फर्म/संस्थेचे/दरपत्रकधारकाचे पॅन कार्ड (Pan Card)

२) जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र (GST Registration Certificate)

३) दरपत्रकधारकाचे हमीपत्र - Vendor Self Declaration (सोबत नमुना जोडला आहे)

४) सोबत दराबाबतचे विवरण देण्यात यावे. दरपत्रक सादर करताना सर्व करांसहीत देणे बंधकारक असेल. दरपत्रकामध्ये मुळ दर व त्यावरील जीएसटी स्वतंत्र दर्शविण्यात यावा. दरपत्रकावर GST/CST/VAT क्रमांक नमुद असणे आवश्यक राहील. संस्थेच्या लेटर हेडवरच दरपत्रक सादर करावे. दरपत्रकावर या कार्यालयाच्या दरपत्रक सुचनेचा संदर्भ क्रमांक व दिनांक नमुद करणे आवश्यक आहे.

५) CA फर्मची मागील तीन आर्थिक वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल किमान रुपये ५०,००,०००/- (पन्नास लाख) असणे आवश्यक राहील.

१०) सोबत जोडलेल्या तक्त्यामधील कारागृहनिहाय वित्तीय वर्षानुसार खालीलप्रमाणे कार्य अपेक्षित आहे:-

i. खातावही (Ledger) तयार करणे

ii. ताळेबंद (Balance Sheet) तयार करणे

iii. नफा-तोटा खाते (Profit & Loss Account) तयार करणे

iv. प्राप्ती व देयके खाते (Receipts & Payments Account) तयार करणे

v. जीएसटी (GST) देयतेची तपासणी करणे.

vi. आयकर अधिनियमांन्वये (Income Tax Act) टीडीएस (TDS) तसेच इतर तरतुदींची पडताळणी करणे.

vii. देयकदारांची (Creditors) अंतिम यादी तयार करणे.

viii. लेखापरीक्षण अहवाल (Audit Report) सादर करणे.

११) संबंधित लेखापाल संस्था (CA Firm) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (C&AG) यांच्याकडे नोंदणीकृत (Empanelled) असणे आवश्यक आहे.

१२) लेखापाल संस्था भारतीय सनदी लेखापाल संस्था (ICAI) यांच्या "Peer Review" प्रक्रियेत प्रमाणित (Peer Reviewed) असणे आवश्यक आहे.

१३) लेखांकन सेवा उधारीवर प्रदान करावी लागेल. अनुदान प्राप्त झाल्यानंतरच बिलाची अदायगी करण्यात येईल.

१४) दरपत्रकासोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये एकल निविदा/ दरपत्रक देण्याबाबत हमीपत्र जोडणे अनिवार्य राहील. (सोबत हमीपत्राचा नमुना जोडला आहे)

१५) सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार कारागृह व वित्तीय वर्षनिहाय दर सादर करावेत.

१६) दरपत्रक उघडण्याचे वेळी दरपत्रक सादर केलेल्या संस्थेचे प्रतिनीधी उपस्थित राहु शकतील.

१७) **वरिल सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबत सदर सुचना पत्रावर मोहर लावून स्वाक्षरी करण्यात यावी व सदर सुचना पत्र दरपत्रकासोबत (तांत्रिक लिफाफ्यामध्ये) जोडण्यात यावे.**

**(योगेश देसाई)**
विशेष कारागृह महानिरीक्षक
कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.

## कारागृह व वित्तीय वर्षानुसार विविध कारागृह उद्योगांतर्गत झालेल्या उत्पादनाचे स्थूल मुल्य:-

(आकडे रु. हजारात)

| अ. क्र. | कारागृहाचे नाव | २०१९-२०२० | सेवा दर (रु.) | २०२०-२०२१ | सेवा दर (रु.) | २०२१-२०२२ | सेवा दर (रु.) | २०२२-२०२३ | सेवा दर (रु.) | २०२३-२०२४ | सेवा दर (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अमरावती मध्यवर्ती कारागृह, अमरावती | ११२०५ | | १५९६५ | | १७६८० | | १३७९७ | | ८५०० | |
| २ | नागपुर मध्यवर्ती कारागृह, नागपुर. | ४४२७० | | ८२६९ | | १५४३३ | | ३२६८५ | | ३४९८९ | |
| ३ | छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृह, छत्रपती संभाजीनगर. | २९१८२ | | ४०३५ | | ९२१७ | | ७८५४ | | १०४१४ | |
| ४ | नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह, नाशिक. | ४३६९९ | | २०५९१ | | १७२०४ | | ३३५३१ | | २४६४१ | |
| ५ | कोल्हापुर मध्यवर्ती कारागृह, कोल्हापुर. | ३५०६७ | | १०००६ | | १२२३४ | | ३४०३६ | | ३६७२७ | |
| ६ | येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे. | ७०२१८ | | २८७४९ | | २९८६६ | | ४२८५३ | | ४४६४५ | |
| ७ | ठाणे मध्यवर्ती कारागृह, ठाणे. | ८५४९ | | ६४५४ | | ९३३१ | | १३७०८ | | ११७०० | |
| ८ | येरवडा खुले जिल्हा कारागृह, पुणे. | १६२२ | | ०० | | ०० | | ९६५ | | ३१२८ | |
| | **एकुण (रु.)** | **२४३८१२** | | **९४०६९** | | **११०९६५** | | **१७९४२९** | | **१७४७४४** | |

(प्रशांत मत्ते)

**अधिक्षक, तुरुंग उद्योग**

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक
कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य,
यांचे कार्यालय, पुणे-०१.

## VENDER SELF DECLARATION
## विक्रेते / निविदाकारची हमी

I/we -----------------------------------------------------shall obey rules & regulation regarding child labor, sexual harassment labor fundamental rights applicable time to time.

We are abraded to obey norms & rules set by government, forest, mines, human rights, No discrimination and anti-corruption activities.

"I/we, the undersigned on behalf of M/s---------------------------------------- do hereby declare that, I/we have not ever been blacklisted and there were no debarring action in past or in process against us/firm for any default in supply of service/material/equipment or any reason in the contract entrusted to us/firm and also no enquiry is pending against us/firms by any Government organization.

I/we guarantee to submit single tender and no conflict and interests with the Purchasing Authority.

All the given documents are true and I am aware, If any document found fake/fabricated immediate debarring action and legal action will be taken against me/us at any stage. In the event of any such information pertaining to the aforesaid matter found wrong at any time at any given point of time during the course of the purchasing my tender shall be liable for cancellation/ termination without any notice at the sole discretion of the purchaser."

**Place / ठिकाण: __________**

**Date / दिनांक: ___________**

SIGN AND SEAL OF THE VENDOR

**संस्था/पुरवठादार/दरपत्रक धारकाची सही व शिक्का**